# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2013)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,४९,खेरवाडी, वांद्रे(पूर्व), मुंबई — ४०० ०५१

दु.क्र: २६४७५०७७/२६४७७२०९ फॅक्स: ९१-०२२-२६४७३९८०

ई-मेल:secretary@msbte.com संकेत स्थळ: www.msbte.org.in

जा.क्र.मरातंशिमं/का-४०/नोंदणी/२०१८/ 235 दिनांक — 01 SEP 2018

## परिपत्रक

**विषय: शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी (Enrollment) व परिक्षा अर्जाचे वेळापत्रक**

संदर्भ: Academic Calendar वर्ष २०१८-१९ - MSBTE/D-40/Academic Calendar/B2/2018/2967 दि. २४/०४/२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये **नविन प्रवेशित** विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन नोंदणी अर्ज संस्थास्तरावर निश्चित करुन हिवाळी -२०१८ परिक्षेकरिता अर्ज भरण्यासाठी व **O/N/R/S/A-Yearly Pattern** मधील सर्व विद्यार्थ्यांसाठी हिवाळी -२०१८ परिक्षेकरिता अर्ज भरण्याचे वेळापत्रक:

| अनु. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १. | संस्थास्तरावर नोंदणी निश्चित करुन नियमित शुल्कासह परिक्षा अर्ज भरणे | दि. ०५/०९/२०१८ ते दि. ११/०९/२०१८ |
| २. | नियमित शुल्क + रु. २००/- दंडासह परिक्षा अर्ज भरणे | दि. १२/०९/२०१८ ते दि. १४/०९/२०१८ |
| ३. | नियमित शुल्क + रु. १,५००/- दंडासह परिक्षा अर्ज भरणे | दि. १५/०९/२०१८ ते दि. १८/०९/२०१८ |
| ४. | विभागीय कार्यालय स्तरावर परिक्षा अर्ज निश्चिती | दि. १५/०९/२०१८ ते दि. १९/०९/२०१८ |
| | **विभागीय कार्यालय स्तरावर परिक्षा अर्ज अंतिम निश्चिती - दि. १९/०९/२०१८ रोजी सायं. ४ वाजेपर्यंत** | |

**नोंदणी प्रक्रिया व परिक्षा अर्ज भरण्याबाबत सूचना:**

१) **प्रथम नोंदणीकृत विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज संस्थास्तरावर निश्चित (Confirm) केल्यानंतर लगेचच विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील. सर्व नोंदणी अर्ज व परिक्षा अर्ज आवश्यक शुल्कासह निश्चितीकरीता विभागीय कार्यालयात सादर करण्यात यावेत.**

२) AICTE अभ्यासक्रमासाठी DTE Portal वर अपलोड केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांनाच नोंदणी करता येईल.

३) नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या संस्थानिहाय व अभ्यासक्रमनिहाय अधिकतम प्रवेशक्षमतेपर्यंत मर्यादित राहील. अधिकतम क्षमतेवरील विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी त्याच्या विशिष्ट प्रवर्गासाठी संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या परवानगीचे पत्र आवश्यक राहील.

४) ऑनलाईन प्रक्रियेत विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) हा महत्त्वाचा टप्पा असून सदर प्रक्रिया अचूकतेने करण्यात यावी. विशेषत: विद्यार्थ्यांचे नाव हे शालांत परीक्षेच्या प्रमाणपत्राप्रमाणेच असणे आवश्यक आहे. फोटोसह स्वाक्षरी असलेली अचूक इमेज अपलोड करणे बंधनकारक आहे. केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून प्राप्त फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज चांगल्या प्रतीची नसल्यास त्याऐवजी नवीन स्कॅन केलेली फोटोसह स्वाक्षरी असलेली इमेज अपलोड करण्यात यावी. नोंदणी

प्रक्रियेनंतर इमेज (फोटोसह स्वाक्षरी) बदलासाठी मंडळाकडे अर्ज केल्यास रु. ५००/- दंड आकारुनच नोंदणी झालेल्या विद्यार्थांचे फोटोसह स्वाक्षरी मध्ये बदल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

५) इयत्ता १२ उत्तीर्ण झालेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षातील विषयामध्ये सूट द्यावयाची असल्यास संस्थेने विद्यार्थ्याची इयत्ता १२ सायन्सची गुणपत्रिका पडताळणी करून Online Link मध्ये माहिती भरून विभागीय कार्यालयात अर्ज निश्चित करावयाचा आहे व त्यानंतरच सदर विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज निश्चित करावे.

६) हिवाळी २०१८ चे सर्व परीक्षा अर्ज निश्चित करताना संस्थाप्रमुखांनी सोबत जोडलेले हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

परीक्षा अर्ज निश्चित करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दि. १८/०९/२०१८ रोजी विद्यार्थी, संस्था व विभागीय कार्यालय यांच्यामार्फत निश्चित झालेले परीक्षा अर्जच हिवाळी परिक्षा-२०१८ करीता ग्राह्य धरण्यात येतील. उपरोक्त विहीत केलेल्या मुदतीनंतर म्हणजेच दि. १९/०९/२०१८ नंतर हिवाळी परिक्षा-२०१८ साठी परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदतवाढ देण्यात येणार नाही.

नोंदणी प्रक्रीयेतील कोणतीही अडचण सोडविण्यासाठी संस्थेच्या लॉगिन मधील मेसेज सिस्टीम मधूनच MSBTE Support शी संपर्क साधण्यात यावा.

(वि. र. जाधव)
प्र. सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत –

१) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१ यांना माहितीस्तव सादर.

२) प्राचार्य, म. रा.तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व संस्था यांनी वरील मुदतीत कार्यवाही पूर्ण करावी.

३) उपसचिव, म. रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद यांना माहीती व कार्यवाहीकरीता

संस्थेचे लेटर हेड

# हमीपत्र

मी श्री/श्रीमती ____________________

प्राचार्य, ____________________ सं.क्र. __________ प्रमाणित करतो की, उन्हाळी/हिवाळी __________ परीक्षेस पात्र व परीक्षेस बसू इच्छिणा-या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याविषयीचे वेळापत्रक निदर्शनास आणून दिलेले आहे.

Student Login मधून विहित शुल्कासह अर्ज भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज संस्थेमार्फत Confirm करण्यात आलेले आहेत. तसेच विहित मुदतीत संस्थेतील कोणताही विद्यार्थी नियमानुसार परीक्षा अर्ज भरण्यापासून वंचित राहिलेला नसून, राहिल्यास त्याला संस्थाप्रमुख म्हणून सर्वस्वी मी जबाबदार राहील.

( प्राचार्य )

नाव –

B. 6

दिनांक -

सही -